गोष्टीची घोंगडी

लेखिका: फेरिडा वुल्फ, हॅरिएट मे सवित्झ

चित्रे: एलेना ऑड्रीओझोला

गोष्टीची घोंगडी

अनुवाद: सुशील मेन्सन



हिमाच्छादित पर्वतरांगांच्या दाटीमध्ये एक छोटेसे गाव वसले होते. *बब्बा झारा* याच गावात राहात असे. मुलांना बब्बा झाराच्या घरातील प्रशस्त जुन्या घोंगडीवर बसायला खूप आवडत असे. तिथे बसून ते बब्बा झाराकडून छान छान गोष्टी ऐकत असत.

एक दिवस बब्बा झाराची नजर *निकोलाईच्या* मोज्यातील भोकावर पडली. सगळी मुले गेल्यावर, तिने निकोलाईसाठी ऊबदार, छान मोज्याची जोडी विणायचे ठरवले. परंतु त्या हिवाळ्यात खूप हिमवर्षाव झाला. गावातील कुणीही माणूस घराबाहेर पडू शकले नाही. बब्बा झाराला कुणी लोकर आणून देऊ शकले नाही. लोकर नाही तर मोजे कसे विणायचे?

“प्रत्येक समस्येवर काहीतरी उपाय असतोच,” बब्बा झारा स्वत:शीच पुटपुटली. “थोडं विचार-चिंतन करायला हवं.”

मग विचार करायला उभारी यावी, म्हणून तिने कपभर चहा घेतला. चहाचा तिसरा घोट घेण्याआधीच काय केले पाहिजे, याची स्पष्ट कल्पना तिला आली.

“असं करू, गोष्टीची घोंगडी लोकरीच्या धाग्यांनी बनलीय. तेच धागे उसकटू आणि त्यांचे मोजे बनवू,” ती मनाशी म्हणाली.

रात्री उशीरा निजानीज झाल्यावर, बब्बा झारा बर्फातून चालू लागली. थोड्या वेळाने ती निकोलाईच्या घराबाहेर पोहोचली. घराच्या दारात नवेकोरे विणलेले मोजे ठेवून ती परतली.

सकाळी एक पोस्टमन आपल्या कामावर निघाला. त्याला त्याच्या टपालाच्या थैलीभोवती एक स्कार्फ लपेटलेला दिसला.

“तुम्हाला माहितीय हा स्कार्फ कुणी बनवला?” तो भेटेल त्या व्यक्तिला विचारू लागला.

परंतु त्या व्यक्तिंना त्याचे उत्तर माहित नव्हते.

दुसऱ्या दिवशी सकाळी, गावातील शाळेचे शिक्षक चुलीसाठी जळणाचे लाकूड आणण्यास अंगणात गेले. त्यांना लाकडाच्या ढीगावर एक उबदार हाजमोज्यांची जोडी दिसली.

तर *इवानोव्ह*बाईंना त्यांच्या पाण्याच्या पंपाशेजारी एक नवाकोरा विणलेला उबदार एप्रन दिसला.

पुढल्या दिवशी भाजीवाल्या बाईच्या अंगावर नेहमीच्या जुन्या फाटक्या शालीऐवजी नवीकोरी शाल दिसू लागली.

एव्हाना, बब्बा झाराच्या घरातील घोंगडी लहान झाली होती. गोष्ट ऐकण्यासाठी येणारी मुले घोंगडीवर दाटीवाटी करून बसू लागली.

दिवसेंदिवस गावकऱ्यांचे कुतूहल वाढतच चालले.

एके दिवशी लहानग्या ओल्गाला एक गूढ नवीन मऊ मुलायम घोंगडी मिळाली आणि खाटिकाच्या चमकदार टकलावर एक आकर्षक लोकरीची टोपी दिसू लागली.

बब्बा झाराच्या घरातील घोंगडी आता आणखीनच अपुरी पडू लागली. मुले या लहानशा घोंगडीवर अक्षरश: कोंबल्यागत बसू लागली.

पण एकदा शिंप्याची खुशालचेंडू मांजर अंगावरचा नीटनेटका कोट मिरवत गुरगुरू लागली, तेव्हा मात्र लोकांच्या मनातील गोंधळ वाढला.

आता गोष्ट ऐकणाऱ्या मुलांना बसण्यासाठी घोंगडीच शिल्लक राहिली नव्हती.

हे गूढ उकलण्याच्या हेतूने सगळे गावकरी महापौरांकडे गेले.

"बब्बा झारा नेहमी काय म्हणते? प्रत्येक समस्येवर काहीतरी उपाय असतोच," महापौरांनी त्यांच्या शंकेचे उत्तर दिले.

मुलांनी जेव्हा पायमोजे, स्कार्फ, हातमोजे, एप्रन, शाल, टोपी, लहान बाळाची घोंगडी आणि कोट घातलेली मांजर या सर्वांना एकत्र पाहिले, तेव्हा ते एकसुरात ओरडले, "या सगळ्या वस्तू तर बब्बा झाराच्या घरातल्या गोष्टीच्या घोंगडीसारख्या दिसतायत."

निकोलाई म्हणाला, "पण तिच्याकडे आता ती घोंगडी नाहीये."

मेयरच्या सारे काही लक्षात आले, "अस्सं आहे तर! बब्बा झाराने तिच्या घोंगडीतली लोकर वापरून हे सारं विणलंय! आता आपणसुद्धा बब्बा झाराला चकीत करून टाकू."

रात्री बब्बा झारा झोपल्यावर गावातील प्रत्येक घरातील घोंगडीची थोडीशी लोकर उसकटण्यात आली. सारी लोकर एकत्र करून बब्बा झाराच्या दरवाजात ठेवण्यात आली.

सकाळी दरवाजा उघडल्यावर बब्बा झारा खरोखरच आश्चर्यचकीत झाली. तिने विविध रंगांची इतकी सारी लोकर यापूर्वी कधीच पाहिली नव्हती. याऊपर, या भेटवस्तुवर एक संदेश लिहिलेला कागद चिकटवला होता:

पुढल्या वेळी मुले गोष्ट ऐकण्यासाठी बब्बा झाराच्या घरी गेली, तेव्हा तिथे त्यांना बसण्यासाठी एक नवीन रंगीबेरंगी घोंगडी होती. बब्बा झाराने मुलांना एका गावाची गोष्ट सांगितली. त्या गावातील लोक नेहमी एकमेकांना मदत करत असत.

गोष्ट संपल्यावर मुलांना प्रेमाने निरोप देताना बब्बा झाराला *अलेक्झांड्राच्या* स्वेटरमध्ये एक भोक दिसले. आपण अलेक्झांड्राला चकीत करू, असे तिने ठरवले. परंतु अजूनही पर्वतांवर हिमवर्षाव सुरु होता आणि संपूर्ण गावात लोकर कुठेही मिळत नव्हती.

प्रत्येक समस्येवर काहीतरी उपाय असतोच, हे बब्बा झाराला पक्के ठाऊक होते. तिने तिच्या नव्याकोऱ्या गोष्टीच्या घोंगडीकडे एकदा पाहिले आणि तिच्या चेहऱ्यावर मंदहास्य उमटले.

समाप्त